क्रमांक : १७९०१ /ब कक्ष,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई
दिनांक : २३ ऑगस्ट, २०२२

# :: परिपत्रक ::

विषय : महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२२ च्या तृतीय (पावसाळी) अधिवेशनातील तारांकित प्रश्न अतारांकित स्वीकृत करण्याबाबत...

संदर्भ : या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक १२७१६/ब, दिनांक १७ जून, २०२२

विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या गुरुवार, दिनांक ११ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र विधानसभेचे तृतीय (पावसाळी) अधिवेशन, २०२२ बुधवार, दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ ते गुरुवार, २५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत विधान भवन, मुंबई येथे घेण्याचा निर्णय झाला आहे. महाराष्ट्र विधानसभेच्या पूर्वनियोजित द्वितीय (पावसाळी) अधिवेशनाकरिता गट क्र.५ चे शुक्रवार, दिनांक २२ जुलै, २०२२ व शुक्रवार, दिनांक २९ जुलै, २०२२ रोजीकरिता सन्माननीय सदस्यांकडून प्राप्त झालेले व विभागाकडे पाठविलेले तारांकित प्रश्न मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी फेरविचारांती अतारांकित स्वीकृत केले आहेत.

( मेघना तळेकर )
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति,

(१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
(२) मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
(३) मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
(४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
यांना माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित.

D:\Reema\Unstarred Note\Circular.docx